**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,**
**Chhatrapati Sambhajinagar-431004 (M.S.) India**
**Board of Examinations & Evaluation**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Office PBX:** 0240-2403399/400
**Office Phone:** 0240-2403178/201

Estd.1958
NAAC Re-accredited A+ Grade

**Website** www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
**E-Mail:** director.exameval@bamu.ac.in

**परिपत्रक/परीक्षा व मूल्यमापन मंडळ/विद्यावाचस्पती/०३/२०२६**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, प्राचार्य, संशोधन केंद्र प्रमुख तसेच त्या-त्या विषयांच्या मा. संशोधन व मान्यता समितीतील अभ्यासमंडळ अध्यक्षांना यांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयात दाखल याचिका क्र. १२५००/२०२६, १२५०२/२०२६, १२५२१/२०२६, १२६३२/२०२६, १२६५२/२०२६, १२६६७/२०२६, १३०२६/२०२६, १३०३१/२०२६, १३०४२/२०२६, १३०४३/२०२६ आणि याचिका क्र. १३०४४/२०२६ वर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

अध्यादेश-२०२४ आधी संशोधन कार्य पूर्ण केलेल्या संशोधकांना दि. ३१-०३-२०२५ या तारखेपूर्वी आपले शोधप्रबंध सादर करण्यासाठी सूचना दि. २०-०६-२०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली होती. जे संशोधक विद्यार्थी दि. ३१-०३-२०२५ रोजीपूर्वीशोधप्रबंध सादर करू शकले नाहीत त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे उपरोक्त प्रमाणे याचिका दाखल केल्या होत्या, त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने रू. १,००,०००/- (रूपये एक लक्ष फक्त) दंडाची रक्कम विद्यापीठाकडे भरून आपला शोधप्रबंध सादर करता येईल अशा प्रकारचा निकाल दिला आहे.

याचिकाकर्त्यांनी विद्यापीठ लेखा विभागाकडे प्रत्येकी रूपये एक लक्ष दंडाची रक्कम भरणा केली आहे. त्यामुळे त्यांना त्यांचा संशोधनकार्य पूर्ण केल्याने अंतिम सारांश पत्रिका(Final Synopsis) व शोध प्रबंध (Thesis) सादर करावयाचा आहे. तसेच अंतिम सारांश पत्रिका सादर करतांना Pre-Ph.D. Viva-Voce घेण्याबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी व त्यांचे शोधप्रबंध सादर करण्यासाठीची प्रक्रिया करून घेण्यात यावी. जणेकरून, त्यांना विद्यावाचस्पती पदवी प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे सुकर होईल.

करिता मान्यता व योग्यत्या कार्यवाहीस्तव सादर.

**भगवान ना. फड**
उपकुलसचिव (विद्यावाचस्पती)

**संदर्भ क्र.** परीक्षा व मूल्यमापन मंडळ/
विद्यावाचस्पती/२०२६/ 585 .
विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर.
**दिनांक:** ०५-१०-२०२६.